# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२१

## नवोपक्रमाचे शीर्षक

# संडे फॉर सायन्स ( SUNDAY FOR SCIENCE )



## गट - प्राथमिक शिक्षक

सादरकर्ते - शिक्षक लोकेश यशवंत चौरावार


शाळा - शहीद मिश्रा विद्यालय तिरोडा , ता - तिरोडा ,जि.गोंदिया

## नवोपक्रमाचे शीर्षक

# संडे फॉर सायन्स ( SUNDAY FOR SCIENCE )

कोरोना काळात विद्यार्थी आणि शिक्षक हे एकमेकांपासून दुरावले असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. शिक्षक व विद्यार्थी प्रत्यक्ष शैक्षणिक आंतरक्रियेच्या माध्यमातून शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमास प्रत्यक्ष रुपात पूर्ण करण्यास एकमेकास सहाय्य करतात. पण कोरोना काळात विज्ञान अध्यापनात प्रत्यक्ष प्रयोगाचे सादरीकरण करणे कठीण होते या वर **जिल्ह्यातील** सर्व विद्यार्थ्यांसाठी संडे फॉर सायन्स नवोपक्रम विज्ञान विषयातील घटकाशी संबंधित प्रयोग विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविता आले.

उपक्रम कालावधी- १५ /०७/२०२१ ते सध्या सुरु आहे.




नवोपक्रम व्हिडीओ लिंक- 1. https://youtu.be/u_pCAabluFA

2. https://youtu.be/r9qxKMg17Qs

3. https://youtu.be/8eG78yth2o8

## नवोपक्रमची गरज व महत्त्व -

1) विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना चालना देण्यास कृतियुक्त विज्ञान शिक्षणाची गरज निर्माण झाली.

2) कोरोना काळात शाळेतील प्रत्यक्ष अध्ययनापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास या उपक्रमाची गरज वाटली.

3) मनोरंजक पद्धतीने विज्ञान शिक्षण देणे हा या उपक्रमाचा वेगळेपणा आहे.

4) या नावोपक्रमाची उपयुक्तता विद्यार्थी ,शिक्षक तसेच पालकांसाठी सिद्ध झाली.

5) कोरोना काळामध्ये अभ्यासात झालेल्या उणीवा भरून काढण्यासाठी रविवारला विज्ञानासाठी उपयोगात आणणे.

**नवराष्ट्र**

अभिनव | **शिक्षक लोकश चौरावार यांचा शैक्षणिक उपक्रम**

# ‘संडे फॉर सायन्स’ला जिल्हाभरातून प्रतिसाद

तिरोडा, (वा.). येथील शहीद मिश्रा विद्यालय येथील विज्ञान शिक्षक लोकेश चौरावार यांनी कोरोना काळात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नवनवीन कल्पना करून शिक्षणाचे हेतू साध्य केले आहे. सध्या शाळा बंद असताना शिक्षण विभाग विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करीत आहे. त्यातच शिक्षक लोकेश चौरावार यांनी ‘संडे फॉर सायन्स’ उपक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिकण्यासाठी आवड निर्माण केली आहे. जिल्ह्यातील अनेक शाळातील विद्यार्थी यात सहभागी होऊन विज्ञानाचे घरगुती प्रयोग शिकून आपले ज्ञान वाढवीत असून त्यांचा या उपक्रमाला उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहेत. चौरावार दर रविवारी ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांशी जुळतात आणि या उपक्रमाचा लाभ घेतात. या पूर्वी त्यांनी राज्य विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक घेऊन तसेच त्यांच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय विज्ञान व गणित मेळाव्यात तृतीय क्रमांक घेऊन गोंदिया जिल्ह्याचे नाव लौकीक केले होते. राज्यात पहिला 3 रुपयात थ्रीडी चष्मा तयार करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला होता. आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांनी करावा या उद्देशाने शिक्षक लोकेश चौरावार अथक प्रयत्न करून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोण बदलताना दिसत आहेत. कृती करून विज्ञानाचे नियम शिकता येतात, हे त्यांच्या उपक्रमातून सिद्ध झाले आहे. समजलेल्या भागावर ऑनलाईन प्रश्नमंजुषा देखील घेतली जात असल्याने या उपक्रमाचा उद्दिष्ट पूर्ण होत आहे.




### यांनी दिल्या शुभेच्छा

शिक्षक चौरावार यांच्या उपक्रमाला प्राथमिक शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधुरी सावरकर, उपशिक्षणाधिकारी प्रदीप समरीत, गटशिक्षणाधिकारी मधू पारधी, संस्थाध्यक्ष रमेशचंद्र झारारीया, डॉ. जुगलकिशोर लद्धा, प्रा. संजीव कोलते, गटसमन्वयक ब्रजेश मिश्रा, विषयतज्ज्ञ सुनील ठाकरे, प्राचार्य सतीश मंत्री, उपप्राचार्य विनोद तागडे, पर्यवेक्षक विकास बारापात्रे, निकेशकुमार मिश्रा, सुनील शेंडे, छाया मडावी, राजेंद्र सिंगनजुडे, गौरव जयस्वाल, दिलीप झारारिया, सुनील राऊत यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

Gondia Edition
10 August 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

## नवोपक्रमाची उद्दिष्टे -

1) विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला वाव देऊन स्व-अध्ययनास प्रवृत्त करणे.

2) घरगुती साधनांपासून विज्ञानाचे प्रयोग करून घटकाचा अभ्यास करणे.

3) वैज्ञानिक सिद्धांताची प्रयोगासोबत सांगड घालून अभ्यास करणे.

4) विज्ञानाचे प्रयोग शिकून स्वताः करून पाहणे.

5) संडे फॉर फन डे ही संकल्पना बदलून संडे फॉर सायन्स संकल्पना अमलात आणणे.

6) जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उपक्रमाचा लाभ देणे.

## नवोपक्रमाचे नियोजन -

1) या उपक्रमापुर्वी विद्यार्थी शाळेपासून दूर असतांना विज्ञान विषयाकडे दुर्लक्ष करत होते. विज्ञान विषयातील घटक फक्त पुस्तक वाचून समजत नसल्याच्या अनेक विद्यार्थी व पालकांच्या तक्रारी होत्या. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी संडे फॉर सायन्स उपक्रमाची निर्मिती करण्यात आली.

2) नवोपक्रम सुरु करण्यापूर्वी पालकांची गृह भेट घेऊन तसेच online मीटिंग च्या माध्यमाने चर्चा करून उपक्रमाची पूर्व कल्पना देण्यात आली.

3) सदर उपक्रमासाठी प्रत्येक शनिवारला प्रयोगासाठी लागणाऱ्या साहित्यांची यादी देण्यात आली.

4) करावयाच्या कृतींचा क्रम -

अ) पालक व विद्यार्थ्यांना उपक्रमाची माहिती करून देणे.

ब) विज्ञानाचे प्रयोगांविषयी  माहिती सांगणे.

क) विज्ञान विषयाची भीती मनातून काढणे.

ड) झूम,गूगलमीट, युटुब वापराबद्दलची माहिती पालक व विद्यार्थ्यांना करून देणे.

इ) प्रत्येक रविवारला वेळापत्रकानुसार नवनवीन प्रयोग करून दाखवणे.

ई) त्यानंतर १० गुणांची online वस्तुनिष्ठ चाचणी घेणे.

5) उपक्रमोत्तर स्तिथी online चाचणी घेऊन तपासणे तसेच विद्यार्थ्यांना शिकवलेल्या प्रयोगांचा व्हिडीओ तयार करून WHATSAPP वर पाठविण्यास सांगणे.


6) उपक्रमाची कार्यवाही तीन टप्प्यातून करणे  उपक्रमापूर्वी विद्यार्थ्यांच्या कलाचा अभ्यास करणे ,प्रत्यक्ष उपक्रम रविवारला राबवणे, समजलेल्या प्रयोगांवर आधारित १० गुणांची प्रश्नमंजुषा घेणे.

7) सदर उपक्रम राबविण्यास शाळेतील मुख्याध्यापक ,इतर शिक्षक व पालकांची मदत घेतल्यास उपक्रम यशस्वीपणे राबविणे शक्य होते.

## नवोपक्रमाची कार्यपद्धती -

### i) पुर्वस्थीतीची निरीक्षणे व नोंदी

या उपक्रमापुर्वी विद्यार्थी अभ्यासापासून दूर होते, विज्ञान विषयातील घटक लवकर समजत नव्हते. या करिता ०५ प्रश्नांची चाचणी घेऊन माहिती संकलित करण्यात आली.




### ii) कार्यावाहीदरम्यान निरीक्षणे व माहितीचे संकलन

सदर उपक्रमाच्या कार्यवाही दरम्यान दर रविवारला विद्यार्थ्यांना मनोरंजक पद्धतीने शिकवलेल्या प्रयोगांची माहिती कितपत समजली हे जाणून घेण्याकरिता online १० गुणांची चाचणी घेण्यात

आली तसेच घरी प्रयोग करतांनाचे व्हिडीओ किवा फोटो whatsapp वर मागविण्यात्त आले. विद्यार्थी पालकांच्या मदतीने सर्व शिकवलेले प्रयोग स्वतः करून पाहू लागले .

चाचणीची लिंक - SUNDAY FOR SCIENCE

शिक्षक लोकेश चौरावार शहीद मिश्रा विद्यालय तिरोडा जि गोंदिया यांचा उपक्रम

ONLINE TEST DATE - 08/08/2021


सर्व विद्यार्थ्यांनी TEST सोडवून आपले घेतलेले ज्ञान तपासावे.

TIP- सर्वांनी एकदाच टेस्ट सोडवावी.तसेच टेस्ट झाल्यावर अचूक उत्तरदेखील दिसतील .

टेस्ट सोडवण्यासाठी खालील लिंक क्लिक करा.

https://testmoz.com/q/9844870

## iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व नोंदी


Need Help?
Testmoz
SUNDAY FOR SCIENCE QUESTIONNAIRE
Dashboard
Settings
Questions
Publish
Results

SUNDAY FOR SCIENCE QUESTIONNAIRE Results

Filter by name / partition by tag / group by name | Search

Export
Point Grid • Response Grid
Audit Logs

| Average Score | Average Time | Responses | Score Histogram |
| --- | --- | --- | --- |
| 57% 0% to 100% | 0:16:13 0:00:12 to 3 days, 22:44:05 | 76 | |

| Name ▲ | Score | Started On | Finished On | Time | 1 70% | 2 53% | 3 63% | 4 61% | 5 67% | 6 63% | 7 57% | 8 43% | 9 43% | 10 50% |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| Aashna | 80% (8/10) | 2021-08-30 5:50 PM | 2021-08-30 5:51 PM | 0:00:32 | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✗ |
| Aashna Harun Mansuri | 80% (8/10) | 2021-08-17 11:58 AM | 2021-08-17 11:59 AM | 0:00:40 | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| Aashna mansuri | 80% (8/10) | 2021-08-12 10:50 AM | 2021-08-12 10:52 AM | 0:02:10 | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| Aditya Deshmukh | 30% (3/10) | 2021-08-10 1:12 PM | 2021-08-10 8:23 PM | 0:01:51 | ✗ | ∅ | ✓ | ✗ | ✗ | ∅ | ✓ | ✓ | ∅ | ✗ |
| Ahant Sudhakar Nagpure | 10% (1/10) | 2021-08-10 2:47 PM | 2021-08-12 9:58 AM | 0:01:25 | ✓ | ∅ | ✗ | ∅ | ∅ | ∅ | ✗ | ∅ | ∅ | ✗ |
| Akanksha | 30% (3/10) | 2021-08-10 5:36 PM | 2021-08-10 5:39 PM | 0:03:34 | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| Akshara gupta | 0% (0/10) | 2021-08-11 8:02 AM | 2021-08-12 7:33 AM | 0:01:21 | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ✗ | ∅ | ✗ | ∅ |
| Anshu kuwar patle | 100% (10/10) | 2021-08-12 4:35 PM | 2021-08-12 4:35 PM | 0:00:18 | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| Anshu kuwarlal patle | 90% (9/10) | 2021-08-12 4:34 PM | 2021-08-12 4:35 PM | 0:00:34 | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ |
| Anshu patle | 30% (3/10) | 2021-08-12 4:32 PM | 2021-08-12 4:32 PM | 0:00:23 | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |

उपक्रम पूर्ण झाल्यावर घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषेचे विश्लेषण केल्यावर आढळले कि अनेक विद्‍यार्थी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवू लागले. जिल्ह्यातील अनेक शाळातील विद्‍यार्थी यात सहभागी होत असल्याने वृत्तपत्र आणि न्यूज चैनल सुद्‍धा उपक्रमास




प्रसिद्‍धी देऊ लागले.



लोकमत

# संडे फॉर सायन्स उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळतेय दिशा

## लोकेश चौरावार : शाळा बंद, पण शिक्षण सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**तिरोडा :** शहीद मिश्रा विद्यालय तिरोडा येथील विज्ञान शिक्षक लोकेश चौरावार यांनी कोरोना काळात विविध उपक्रम करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नवनवीन कल्पना करून शिक्षणाचे हेतू साध्य केला आहे. सध्या शाळा बंद असताना शिक्षण विभाग विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करीत आहे. त्यातच शिक्षक लोकेश चौरावार यांनी संडे फॉर सायन्स उपक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाप्रति आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.

जिल्ह्यातील अनेक शाळातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी असून दर रविवारला विज्ञानाचे घरगुती प्रयोग शिकून आपले ज्ञान वाढवित आहेत. शिक्षक लोकेश चौरावार दर रविवारी ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांशी जुळतात आणि विद्यार्थ्यांना नवनवीन प्रयोगांची माहिती देतात. यापूर्वी त्यांनी राज्य विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक घेऊन तसेच त्यांच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय विज्ञान व गणित मेळाव्यात तृतीय क्रमांक घेऊन गोंदिया जिल्ह्याचे नावलौकिक केले होते. तसेच राज्यात पहिला ३ रुपयात थ्रीडी चष्मा तयार करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला होता. आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांनी करावा या उद्देशाने शिक्षक लोकेश चौरावार विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन बदलताना दिसत आहेत. कृती करून विज्ञानाचे नियम शिकता येतात हे त्यांच्या उपक्रमातून सिद्ध झाले आहे. शिक्षक लोकेश चौरावार यांच्या उपक्रमाला प्राथमिक शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे,माध्यमिक शिक्षणाधिकारी माधुरी सावरकर,उपशिक्षणाधिकारी प्रदीप समरीत,गटशिक्षणाधिकारी मधू पारधी, संस्थाध्यक्ष रमेशचंद्र झारारिया,डॉ. जुगलकिशोर लद्धा,प्रा. संजीव कोलते, गटसमन्वयक ब्रजेश मिश्रा, विषयतज्ञ सुनील ठाकरे, प्राचार्य सतीश मंत्री, उपप्राचार्य विनोद तागडे, पर्यवेक्षक विकास बारापात्रे, निकेशकुमार मिश्रा, सुनील शेंडे, छाया मडावी,राजेंद्र सिंगनजुडे, गौरव जयस्वाल, दिलीप झारारिया, सुनील राऊत यांनी कौतुक केले आहे.

### प्रश्नमंजूषा स्पर्धेतून चाचणी

- शिक्षक चौरावार हे विद्यार्थ्यांना ऑनलाइनच्या माध्यमातून विज्ञानाच्या नवीन प्रयोगांची माहिती देतात. तसेच हे प्रयोग विद्यार्थ्यांना कितपत समजले याची चाचपणी करण्यासाठी समजलेल्या भागावर ऑनलाइन प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतात. यामुळे विद्यार्थ्यांची विज्ञान विषयात रुची वाढविण्या- ससुध्दा मदत होत आहे.

Hello Gondia
Page No. 4 Aug 09, 2021
Powered by: erelego.com



## नावोपक्रमाची यशस्विता /फलनिष्पत्ती -

1) विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला वाव मिळाला व ते स्व-अध्ययनास प्रवृत्त झाले.

2) घरगुती साधनांपासून विज्ञानाचे प्रयोग करून घटकाचा अभ्यास करू लागले.

3) प्रयोगामागील वैज्ञानिक सिद्धांताची अभ्यासासोबत सांगड घालून अभ्यास करु लागले .

4) विज्ञानाचे प्रयोग शिकून स्वतः करून पाहू लागल्याने विज्ञान विषयाची भीती मनातून निघाली .

5) संडे फॉर फन डे ही संकल्पना बदलून संडे फॉर सायन्स संकल्पना अमलात आली आणि रविवारचा उपयोग अभ्यासासाठी झाला..

6) जिल्ह्यातील अनेक शाळांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना उपक्रमाचा लाभ YOUTUBE च्या माध्यमाने मिळाला

7) उपक्रम राबवतांना प्रश्नमंजुषा स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## समारोप-

संडे फॉर सायन्स हा नवोपक्रम विद्यार्थी पालक व शिक्षकांसाठी अभ्यासासोबत नवकल्पना जागृती करण्यास पूरक ठरला. प्रत्येक रविवारला विद्यार्थ्यांसोबत पालकहीया कार्यक्रमाची वाट आवर्जून बघत होते. अभ्यासा पासून दूर जात असलेल्या विद्यार्थ्यांना जवळ आणण्यास या उपक्रमाची मदत झाली. सदर नवोपक्रम हा अशाच सतत सुरु ठेवावा अशी सर्वांची इच्छा आजही पल्लवित आहे. हा उपक्रम राबवितांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या सहकार्य करणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहे .

**लोकमत**

### प्रश्नमंजूषा व व्हिडिओ स्पर्धेचे पारितोषिक वितरित

लोकमत न्यूज नेटवर्क

**तिरोडा :** येथील शहीद मिश्रा विद्यालयात संडे फॉर सायन्स उपक्रमांतर्गत शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या ऑनलाइन प्रश्नमंजूषा व व्हिडिओ स्पर्धेचे पुरस्कार वितरीत करण्यात आले.

या स्पर्धेत प्रत्येक वर्गातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी भेट देऊन पारितोषिक, प्रशस्तिपत्र व कृतिपत्रिका देऊन सत्कार करण्यात आला. त्यानुसार, अलिना एजाज शेख,



विजेत्या विद्यार्थिनीचा सत्कार करताना शिक्षक.

भ्रांती पटले, कार्तिक इंगळे, वैष्णवी रहांगडाले, पवित्र बहेकार, पवण मानकर, साहील मानकर, प्राची तुरकर, आरुषी हरिणखेडे, राखी कुथेकर, सेजल मेश्राम, आर्यन घोडमारे, सुहानी लिल्हारे यांच्या घरी जाऊन केंद्रप्रमुख यू. पी. पारधी, प्राचार्य सतीश मंत्री, पर्यवेक्षक विकास बरापात्रे, शिक्षक निकेश मिश्रा, तुलसीदास मडावी, लोकेश चौरावार, दिलीप झरारिया, सुनील शेंडे, जितसिंग जगणे, छाया मडावी, संध्या खंडाते, स्मिता मेश्राम, ओमेश्वरी चौधरी, रंजीता वाहणे, लीना राऊत, सुनंदा मसुरकर, सुनील राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आयोजक लोकेश चौरावार यांनी आभार मानले.

**नवभारत**

### प्रतियोगियों को पुरस्कार वितरित

■ **तिरोड़ा** (सं). विज्ञान पहल के तहत शहीद मिश्रा विद्यालय में ऑनलाइन प्रश्नोत्तरी व वीडियो प्रतियोगिता आयोजित हुई. प्रत्येक वर्ग के प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करने वाले विजेताओं को उनके घरों में पहुंचकर सम्मानित किया गया. केंद्र के प्रमुख उमाशंकर पारधी ने कहा कि प्रतियोगिता से छात्रों की प्रगति होती है. सफल छात्रों में अलीना एजाज शेख, भ्रांति पाटले, कार्तिक इंगले, वैष्णवी रहांगडाले, पवित्रा बाहेकर, पवन मानकर, साहिल मानकर, प्राची तुरकर, आरुषि हरिणखेड़े,



राखी कुठेकर, सेजल मेश्राम, आर्यन घोड़मारे, सुहानी लिल्हारे का समावेश हैं. चौधरी, रंजीता वहाणे, लीना राउत, सुनंदा मसूरकर, सुनील राउत का अभिनंदन किया गया. आभार आयोजक लोकेश चौरावर ने माना.

Gondia Edition
15-september-2021 Page No. 2
epaper.enavabharat.com

### प्रश्नमंजुषा व व्हिडिओ स्पर्धेचे पारितोषिक वितरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**तिरोडा** ■ शहीद मिश्रा विद्यालय तिरोडा येथे संडे फॉर सायन्स उपक्रमांतर्गत शिक्षक दिननिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा व व्हिडिओ स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत प्रत्येक वर्गातून प्रथम ,द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी भेट देऊन पारितोषिक, प्रशस्तीपत्र व कृतीपत्रिका देऊन सत्कार करण्यात आले.

स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या प्रगतीला चालना देते असे मत केंद्रप्रमुख उमाशंकर पारधी यांनी व्यक्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अलिना एजाज शेख ,भ्रांती पटले, कार्तिक इंगळे, वैष्णवी रहांगडाले, पवित्र बहेकार, पवण मानकर, साहील मानकर ,



प्राची तुरकर,आरुषी हरिणखेडे,राखी कुथेकर, सेजल मेश्राम,आर्यन घोडमारे , सुहानी लिल्हारे यांनी यश संपादन केले.शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन केंद्रप्रमुख यू.पी.पारधी,प्राचार्य सतीश मंत्री, पर्यवेक्षक विकास बरापात्रे, शिक्षक निकेशकुमार मिश्रा , तुलसीदास मडावी , लोकेश चौरावार, दिलीप झरारिया ,सुनील शेंडे, जितसींग जगणे, छाया मडावी , संध्या खंडाते , स्मिता मेश्राम , ओमेश्वरी चौधरी , रंजीता वाहणे,लीना राऊत, सुनंदा मसुरकर,सुनील राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. आयोजक लोकेश चौरावार यांनी सर्व अतीथीचे आभार मानले.

ePaper देशोन्नती
Wed, 15 September 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/63119495

## संदर्भसूची व परिशिष्टे परिशिष्ट -1

## SUNDAY FOR SCIENCE QUESTIONNAIRE ( चाचणी प्रश्नावली )

1. एका जुन्या मोटर ने led light सुरू केल्यास कोणती energy कशात बदलते?

   - Mechanical to Heat
   - Mechanical to electrical
   - Electrical to mechanical
   - Light to electrical

2. Light always travel in a straight line.

   - True
   - False

3. Robot तयार करण्यासाठी कोणती बॅटरी उपयोग करायला सांगितली .

   - 12 V
   - 6V
   - 12 W
   - 6V

4. Juice Straw ने आपण कशाचा मॉडेल तयार करू शकतो.

   - Chloroplast
   - Nucleus
   - Mitochondria
   - DNA

5. Light is made up of ............... Colours.

   - 3
   - 5
   - 6
   - 7

Enter your text here

6. Which experiment show the acid and base test ?

 Chocolate

 Blood

 Litmus

 Filter

7. In acid litmus paper turn into ............. Colour

 Grey

 Red

 Blue

 White

8. ज्या वस्तुमधून light जात नाही त्याला काय म्हणतात?

 Transparent

 Translucent

 OPAQUE

 Hole

9. What is necessary for production of sound ?

 Vaccum

 Vibration

 Medium

 None of these

10. कोणत्या प्रयोगाने आपण सांगू शकतो की gas exert pressure on liquid ?


 Straw and water bottle, Balloon

 Litmus

 Hibiscus

 Dna

# परीशिष्ट 2 - चाचणी निकाल



Testmoz

SUNDAY FOR SCIENCE QUESTIONNAIRE

Dashboard

Settings

Questions

Publish

Results

Logout

## SUNDAY FOR SCIENCE QUESTIONNAIRE Results

Filter by name / partition by tag / group by name | Search | Export Point Grid • Response Grid | Audit Logs

| Average Score | Average Time | Responses | Score Histogram |
|---|---|---|---|
| 57%<br>0% to 100% | 0:16:13<br>0:00:12 to 3 days, 22:44:05 | 76 | |

| Name▲ | Score | Started On | Finished On | Time | 1<br>70% | 2<br>53% | 3<br>63% | 4<br>61% | 5<br>67% | 6<br>63% | 7<br>57% | 8<br>43% | 9<br>43% | 10<br>50% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Aashna | 80% (8/10) | 2021-08-30 5:50 PM | 2021-08-30 5:51 PM | 0:00:32 | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✘ |
| Aashna Harun Mansuri | 80% (8/10) | 2021-08-17 11:58 AM | 2021-08-17 11:59 AM | 0:00:40 | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✔ |
| Aashna mansuri | 80% (8/10) | 2021-08-12 10:50 AM | 2021-08-12 10:52 AM | 0:02:10 | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✘ | ✔ |
| Aditya Deshmukh | 30% (3/10) | 2021-08-10 1:12 PM | 2021-08-10 8:23 PM | 0:01:51 | ✘ | ∅ | ✔ | ✘ | ✘ | ∅ | ✔ | ✔ | ∅ | ✘ |
| Ahant Sudhakar Nagpure | 10% (1/10) | 2021-08-10 2:47 PM | 2021-08-12 9:58 AM | 0:01:25 | ✔ | ∅ | ✘ | ∅ | ∅ | ∅ | ✘ | ∅ | ∅ | ✘ |
| Akanksha | 30% (3/10) | 2021-08-10 5:36 PM | 2021-08-10 5:39 PM | 0:03:34 | ✔ | ✔ | ✘ | ✘ | ✔ | ✘ | ✘ | ✘ | ✘ | ✘ |
| Akshara gupta | 0% (0/10) | 2021-08-11 8:02 AM | 2021-08-12 7:33 AM | 0:01:21 | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ∅ | ✘ | ∅ | ✘ | ∅ |
| Anshu kuwar patle | 100% (10/10) | 2021-08-12 4:35 PM | 2021-08-12 4:35 PM | 0:00:18 | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| Anshu kuwarlal patle | 90% (9/10) | 2021-08-12 4:34 PM | 2021-08-12 4:35 PM | 0:00:34 | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✔ |
| Anshu patle | 30% (3/10) | 2021-08-12 4:32 PM | 2021-08-12 4:32 PM | 0:00:23 | ✔ | ✘ | ✘ | ✔ | ✘ | ✘ | ✘ | ✘ | ✘ | ✔ |
| Anshum katre | 90% (9/10) | 2021-08-11 8:02 AM | 2021-08-11 8:03 AM | 0:01:00 | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✔ | ✔ |
| Arju pappu Rinait | 60% (6/10) | 2021-08-12 11:27 AM | 2021-08-12 11:29 AM | 0:01:30 | ✔ | ✘ | ✔ | ✘ | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✘ | ✔ |
| Aryan rathod | 30% (3/10) | 2021-08-10 10:46 PM | 2021-08-10 10:49 PM | 0:02:53 | ✔ | ✘ | ✘ | ✔ | ✘ | ✔ | ✘ | ✘ | ✘ | ✘ |
| Avadhi sanjay patle | 70% (7/10) | 2021-08-11 6:29 AM | 2021-08-11 6:31 AM | 0:02:06 | ✔ | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✘ |
| Daksh | 60% (6/10) | 2021-08-10 7:54 PM | 2021-08-10 7:58 PM | 0:04:17 | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✔ | ✔ | ✔ | ✘ | ✘ | ✘ |

## परिशिष्ट - 3 उपक्रमाच्या काही क्षणचित्रे

शहीद मिश्रा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री विकास बारापात्रे ,केंद्रप्रमुख राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री. यु.पी.पारधी व शिक्षक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे सत्कार करून प्रमाणपत्र व पारितोषिक देण्यात आले.



**मोबाईल नसलेल्या विद्यार्थ्यांना गृहभेटी देतांना प्रयोग शिकवण्यात आले.**

नवोपक्रम व्हिडीओ लिंक- 1) https://youtu.be/u_pCAabluFA

2 https://youtu.be/r9qxKMg17Qs 3 https://youtu.be/8eG78yth2o8

## संदर्भ सूची-


1) youtube च्या माध्यमाने विविध नवनवीन प्रयोग शिकून विद्याथ्यांना शिकवतांना मदत घेतली.

2) नवोपक्रम अहवाल लेखन कार्यशाळा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र https://www.youtube.com/watch?v=7_BjMmcx1Hc

3) **CCL IIT GANDHINAGAR Website: http://ccl.iitgn.ac.in/**

4) **अरविंद गुप्ता SCIENCE TOYS http://www.arvindguptatoys.com/**

5) **MY YOUTUBE CHANNEL LOKESH CHOURAWAR**

**https://youtube.com/channel/UCpjegGRfCRIe-5wZ5uLQs2w**


नवोपक्रम व्हिडीओ लिंक- 1. https://youtu.be/u_pCAabluFA

2. https://youtu.be/r9qxKMg17Qs

3. https://youtu.be/8eG78yth2o8

# प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र

अहवालाच्या एक प्रत संशोधन विभागीकडे कार्यक्रमाच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील.

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. लोकेश यशवंत चौरावार प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला SUNDAY FOR SCIENCE

हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 28/10/2021

स्थळ : तिरोडा

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : लोकेश यशवंत चौरावार

शाळेचा / कार्यालयाचा शिक्का.

Shahid Mishra High School TIRORA

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. लोकेश यशवंत चौरावार हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला SUNDAY FOR SCIENCE

हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 28/10/2021

स्थळ : तिरोडा

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : विकास इ. बारापात्रे

शिक्का: HEAD MASTER Shahid Mishra High School TIRORA Distt. Gondia

Shahid Mishra High School TIRORA